# कलम २९ खाली विक्री परवानगी

**आवश्यक कागदपत्र** (Initial Scrutiny)

* सन १९५६-५७ पासून आजपर्यंतचे पिकपहाणी दर्शविणारा ७/१२ चा उतारा व त्यावरील गा.न.नं.६ चे सर्व उतारे

* जमिन विक्रेत्याचा गा.न.नं.७/१२ व ८ अ चा अदययावत उतारा

* संबधीत जमीनीचा गटबूक उतारा व हिस्सेदर्शक नकाशा/तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांचेकडील मोजणी नकाशा

* संबधीत तलाठी यांचेकडील संबधीत जमिनीबाबत सरकारी बाकी नसल्याचा दाखला,जमिनी भुसंपादनात समाविष्ट नसल्याचा दाखला, वनखात्याच्या तरतुदी लागु नसले बाबतचा दाखला, सिआरझेड, सार्वजनिक कामासाठी राखीव नसले बाबतचे दाखला व अर्जदार आदिवासी नसल्याबाबतचा दाखला

* जमिन विक्रेत्याचे प्रस्तुत जमीनीचे संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा अगर वाद प्रलंबित नसलेबाबत तसेच कोणत्याही व्यक्तीची हरकत नसल्याबाबतचे तसेच सदरहू जमिनीचे यापूर्वी अन्य कोणासोबतही हस्तांतरण/साठेकरार केल्यानसल्याबाबतच प्रतिज्ञापत्र

* जमीन खरेदीदाराचा अर्ज

* जमिन खरेदीदाराने प्रस्तुत जमीन खरेदी केल्यानंतर त्यांच्याकडे एकुण होणारे क्षेत्र हे सिलींग मर्यादेपेक्षा अधिक होत नसले बाबतचे प्रतिज्ञापत्र

* जमिन खरेदीदार हे शेतकरी असलेबाबतचे पुराव्यासाठी लागणारे कागदपत्र (७/१२, ८अ व ते मुळ शेतकरी कशा प्रकारे झाले त्याबाबतचा गा.न.नं.६ चा उतारा)

* जमीन विक्रेते यांचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक असले बाबतचा पुरावा अथवा जमीन कसण्यास अपात्र असले बाबतचे सिव्हील सर्जनचे प्रमाणपत्र

* प्रकरणी कुळअखत्यारी नेमला असल्यास त्याबाबतचा मुळ/साक्षांकित नोंदणीकृत कुळअखत्यार पत्र

**चौकशी कोणा-कोणाची**

संबधीत तहसिलदार

**परवाना मंजुरीबाबत वेळापत्रक**

**अर्ज प्राप्तीचे दिवशी चौकशी साठी**

| | |
|---|---|
| संबधीत तहसिलदार | ३० दिवस |
| चौकशी अहवाल प्राप्त झालेनंतर परवाना मंजुरीसाठी | १० दिवस |

# कलम २९ खाली विक्री परवानगी

*महाराष्ट्र शेतजमिन (ज.धा.क.म.) अधिनियम १९६१ चे कलम २९ खाली विक्री परवानगी

**अर्जाचा नमुना**

प्रति,

मा. जिल्हाधिकारी

रायगड-अलिबाग

अर्जदार :-

विषय :- महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणा कमाल मर्यादा) अधिनियम १९६१चे कलम २९ अन्वये जमिन विक्री परवानगी मिळणेबाबत...

महोदय,

मौजे --------------- ता.-------------- जि. रायगड येथिल खालिल वर्णनाची जमीन

| स.नं./गट नंबर | क्षेत्र | आकार | पैकी क्षेत्र |
|---|---|---|---|
| | | | |

ही जमीन मा. तहसिलदार यांचे आज्ञापत्र क्र.----------- /फेरफार नोंद क्रमांक ------ दि. / /२०० अन्वये कायम स्वरुपी लागवडीसाठी वाटप करण्यात आली असून, आदेशातील शर्ती व आटींचे पालन केले आहे.

सदरची जमीन माझ्या रहात्या घरापासून दुरच्या अंतरावर/वाढत्या महागाईमुळे शेती व्यवसाय परवडत नसल्यामुळे शेती व्यवसाय करु शकत नसल्यामुळे ही जमीन श्री.------------------------------- यांस विक्री करत आहे. जमीन खरेदी घेणार हे शेती प्रयोजनासाठी/अकृषिक प्रयोजनासाठी शेती खरेदी करणार असून, नियमाप्रमाणे घेणार प्रिमीयम अगर नजराणा भरणेस तयार आहेत.

तसेच सदरची जमीनीचा यापुर्वी हस्तांतरणाबाबत, व्यवहार केलेला नाही. तसेच कोणत्याही दिवाणी अगर महसूल न्यायालयात दावा प्रलंबित नाही. तरी आम्हास महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणा कलम मर्यादा) अधिनियम १९६१ चे कलम २९ अन्वये जमीन विक्री परवानगी मिळणेस विनंती आहे.

अ) जमीन देणार यांची माहीती खालील प्रमाणे :-

१. जमीन प्राप्त झाल्याच्या आदेशाची/फेरफार नोंदीची प्रत
२. गट नं. ---------- या जमिनीचा गटस्कीम प्रमाणे स.नं. -------- असून सोबत गट नंबर, स.नं.चा ७/१२, उतारा व त्या वरील सर्व फेरफार उतारे तसेच गटस्किम रजिष्टरचा उतारा
३. प्रतिज्ञापत्र

४. बाकी नसल्याचा, भूसंपादनात समाविष्ट नसल्याचा, वन संवर्धन कायद्याच्या तरतुदी लागू नसल्याचे तलाठी यांचे दाखले.

ब) खरेदी घेणार यांची माहीती :-

१. संपुर्ण पत्ता
२. खरेदीदार शेतकरी असल्याचा पुरावा/घेणार कंपनी असल्यास नोंदणीकृत मेमोरंडमची प्रत
३. प्रतिज्ञापत्र
४. प्रिमियम/नझराणा रक्कम भरणेस तयार असल्याचे प्रतिज्ञापत्र व बँक खाती जमा रक्कमेबाबत पासबुकाची झेरॉक्स

आपले विश्वासू

खरेदी घेणार-

खरेदी देणार-